# AEML Generation
# MYT Petition

# Executive Summary - Marathi

# Case No. 298 of 2019

# अनुक्रमणिका

**१. कार्यकारी सारांश........................................................................................................२**

१.१ याचिकेची पार्श्वभूमी आणि व्याप्ती........................................................................................................२

१.२ वीज खरेदी करार (पीपीए) ........................................................................................................२

**२. २०१८च्या प्रकरण क्र.३१६ मधील पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव...........................................................३**

**३. आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष २०१८-१९ चे अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१९-२०चे हंगामी अचूक समायोजन.४**

३.१ प्रचालनात्मक कामगिरी........................................................................................................४

३.२ ऊर्जा शुल्क........................................................................................................४

३.३ स्थिर शुल्क........................................................................................................४

३.४ आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये अतिरिक्त प्रभाव........................................................................................................५

३.५ आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी अचूक समायोजन........................................................................................................५

३.६ आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी अचूक समायोजन........................................................................................................६

३.७ आर्थिक वर्ष २०१९-२० साठी हंगामी अचूक समायोजन........................................................................................................८

**४. आर्थिक वर्ष २०१७-१८ आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या महसुली तफावतीवर/(अधिक्यावर) वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट)......९**

**५. नियंत्रण काळासाठी समग्र महसूल आवश्यकतेचा अंदाज........................................................................१०**

५.१ नियंत्रण काळासाठी प्रचालनात्मक कामगिरी........................................................................................१०

५.२ नियंत्रण काळासाठी वार्षिक महसुली आवश्यकता........................................................................................११

# १. कार्यकारी सारांश

## १.१ याचिकेची पार्श्वभूमी आणि व्याप्ती

एमवायटी नियमावली, २०१९च्या नियमन ५.१(अ) मध्ये बहु–वर्षीय दर याचिका दाखल करण्याची तरतूद आहे, जिच्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:

- एमवायटी नियमावली, २०१५ अंतर्गत नियंत्रित केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ साठी अचूक समायोजन.
- एमवायटी नियमावली, २०१५ अंतर्गत नियंत्रित केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१९–२० साठी हंगामी अचूक समायोजन.
- एमवायटी नियमावली , २०१९ अंतर्गत नियंत्रित केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०२०–२१ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ पर्यंतच्या नियंत्रित काळाच्या प्रत्येक वर्षासाठी समग्र महसुली आवश्यकता (ॲग्रेगेट रेव्हेन्यू रिक्वायरमेंट) (एआरआर).
- अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ही अदानी ट्रान्समिशन लि. यांची १००% सहायक कंपनी आहे, जी मुंबई शहराला वीज पुरवठा करणाऱ्या, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या एकत्रीकृत निर्मिती, प्रेषण आणि वितरण सोयी सुविधांच्या अधिग्रहणानंतर तयार केली गेली. २०१८–१९ या आर्थिक वर्षात, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या २० नोव्हेंबर २०१७ दिनांकित आदेशाद्वारे, १९ जानेवारी, २०१७ रोजीच्या पूर्वीच्या आदेशासोबत वाचावे, विधिवत मंजूर केले गेलेल्या एका स्कीम ऑफ अरेंजमेंट द्वारे, रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांचा मुंबई निर्मिती, प्रेषण आणि वितरण व्यवसाय (''जीटीडी'' व्यवसाय) हा मेसर्स अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (यापूर्वी रिलायंस इलेक्ट्रिक जनरेशन अँड सप्लाय लिमिटेड या नावाने ओळखले गेलेले) यांच्यामध्ये निहित केला गेला. त्यानुसार, २९.०८.२०१८ पासून, एईएमएल यांनी मुंबई जीटीडी व्यवसायाचे चालन आपल्या स्वत:च्या नावाने करण्यास सुरुवात केली.

## १.२ वीज खरेदी करार (पीपीए)

माननीय आयोगाने एईएमएल–डी यांच्यासोबत ५ वर्षांसाठी पीपीए मंजूर केला आहे, जो २३ फेब्रुवारी, २०२३ मध्ये समाप्त होत आहे. (वर्तमान याचिकेसाठी सुसंगत) नियंत्रण काळाच्या दरम्यान आणि त्यानंतरही, एईएमएल–जी ही, एक निरंतर चालू राहणाऱ्या व्यवसायाच्या स्वरूपामध्ये, एईएमएल–डी यांना, एडीटीपीएस द्वारे नियंत्रित प्रशुल्क नियमां अंतर्गत वीज पुरवठा करत राहील असे विचारात घेऊन, ही याचिका दाखल केली जात आहे.

एडीटीपीएस चे विविध फायदे लक्षात घेता, एईएमएल–जी आणि एईएमएल–डी यांच्यामधील पीपीए हा निरंतर चालू राहील असे मानले गेले आहे आणि त्यानुसार, ही याचिका नियंत्रण काळाच्या प्रत्येक वर्षाचा अंतर्भाव करते. हा दृष्टिकोन मंजूर करण्याची आणि नियंत्रण काळाच्या प्रत्येक वर्षासाठी स्थिर आणि परिवर्तनशील शुल्क पुरवण्याची माननीय आयोगाला विनंती केली जात आहे. पीपीए च्या पुढील मंजुरीच्या प्रकरणाची तरीसुद्धा, वेगळ्या प्रक्रियेमध्ये हाताळणी होईल.

## २. २०१८च्या प्रकरण क्र.३१६ मधील पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव

२०१७च्या प्रकरण क्र. २०२ मध्ये, आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८चे हंगामी अचूक समायोजन आणि एआरआर चे सुधारित अंदाज व आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचे प्रशुल्क निर्धारीकरण यांच्यासाठीच्या मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिकेच्या प्रकरणामध्ये, माननीय आयोगाने १२ सप्टेंबर, २०१८ दिनांकित आदेश जारी केला होता. काही प्रकरणाविषयी असंतुष्ट होऊन, एईएमएल-जी यांनी माननीय आयोगापुढे, २०१८चा मामला क्र. ३१६ ही एक पुनरावलोकन याचिका दाखल केली. माननीय आयोगाने ७ डिसेंबर २०१८ रोजी आदेश जारी केला, ज्यामध्ये त्यांनी खालील मुद्द्यांवर पुनरावलोकनास परवानगी दिली:

- आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये करिता आयात कोळशाच्या खर्चासाठी नामंजुरी
- डीपीआर योजनांच्या खर्चाची नामंजुरी

२०१८च्या प्रकरण क्र. ३१६च्या (मंजूर झालेल्या अतिरिक्त भांडवलीकरणाच्या संबंधात) पुनरावलोकन आदेशाच्या प्रभावाचा सारांश खालील तक्त्यामध्ये दाखवला आहे:

**तक्ता १: पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव** **रु. कोटी**

| विवरण | आर्थिक वर्ष २०१५-१६ | | आर्थिक वर्ष २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|
| | एमटीआर आदेश | सुधारित अचूक समायोजन | एमटीआर आदेश | सुधारित अचूक समायोजन |
| घसारा | २७.८६ | २७.८७ | २९.८१ | २९.८५ |
| व्याज | १९.८५ | १९.८९ | १९.१० | १९.२४ |
| इक्विटीवर परतावा (आरओई) | ८८.२३ | ८८.२३ | ९०.२६ | ९०.३५ |
| आयकर | ३३.२८ | ३३.२६ | २८.४४ | २८.३८ |
| **एकूण** | **१६९.२२** | **१६९.२६** | **१६७.६२** | **१६७.८२** |

म्हणूनच, एईएमएल-जी माननीय आयोगास विनंती करत आहे की पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी रु. ०.०४ कोटी आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी रु. ०.२० कोटी असा मंजूर करावा आणि त्याप्रमाणे, वर दाखवलेल्या तक्त्यांप्रमाणे, आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७च्या कायम मालमत्ता शिलकी सुधारणा करावी. एआर मधील अतिरिक्त भत्त्याचा प्रभाव आणि त्यावरील वहन खर्च हे आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी एआरआर चाच एक भाग समजला गेला आहे.

## ३. आर्थिक वर्ष २०१७–१८, आर्थिक वर्ष २०१८–१९ चे अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१९–२० चे हंगामी अचूक समायोजन

### ३.१ प्रचालनात्मक कामगिरी

एईएमएल–जी ने उपरोक्त वर्षांच्या प्रत्यक्ष आणि मूळ कामगिरी मापदंडांच्या तुलनेचे सविस्तर तपशील दिले आहे. उपलब्धता ८५%च्या लक्ष्यापेक्षाही अधिक असल्यामुळे संपूर्ण स्थिर खर्च वसुली होऊ शकली, परंतु मुख्यत्वे एमएसएलडीसी ने जारी केलेल्या मागे फिरण्याच्या (बॅकिंग डाऊन) आदेशांमुळे, निकषांच्या तुलनेत पीएलएफ मध्ये तफावत होती.

### ३.२ ऊर्जा शुल्क:

आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ च्या ऊर्जा शुल्कांचे अचूक समायोजन करण्याच्या हेतूने, एईएमएल–जी ने वास्तविक वीज उत्पादनासाठीच्या वीज शुल्कांचा हिशोब वास्तविक किंमत आणि इंधनांचे उष्मांक मूल्य आणि प्रमाणकानुसारी कामगिरी मापदंडांच्या आधारे केला आहे. आर्थिक वर्ष २०१९–२० साठी, वास्तविक आणि त्या वर्षाच्या अंदाजे कामगिरीच्या आधारे अंदाज मांडला आहे.

### ३.३ स्थिर शुल्क:

स्थिर शुल्काच्या हेतूसाठी, एईएमएल–जी ने आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ मधील वास्तविक भांडवलीकरणाचे तपशील पुरवले आहेत. एआरआर च्या इतर घटकांवर खालील मुद्द्यांच्या आधारे दावा केला गेला आहे:

अ. घसारा: एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदीनुसार प्रमाणे हिशोब केलेला.

ब. कर्जावरील व्याज: प्रत्यक्ष कर्ज यादीच्या आधारे व्याजाचा भारित सरासरी दर (आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी: आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी एईएमएल–टी आणि एईएमएल–डी कारण वास्तविक कर्ज नव्हते आणि २०१८–१९ साठी: २८.०८.२०१९ पर्यंतच्या काळासाठी एईएमएल–टी आणि एईएमएल–डी आणि २९.०८.२०१८ ते ३१.०३.२०१९ या काळासाठी वास्तविक) या वर्षांमधील विचारात घेतले आहे आणि व्याजाचा हिशोब एमवायटी नियामावली, २०१५ च्या तरतुदीनुसार केला गेला आहे.

क. भागभांडवलावरील परतावा: एमवायटी नियामावली, २०१५ च्या तरतुदीनुसार हिशोब केला गेला आहे.

ड. संचालन व देखभालीवरील (ओ एंड एम) खर्च: प्रमाणकानुसारी खर्चाशी तुलनात्मक वास्तविक खर्च आणि त्यावर व्युत्पन्न निव्वळ हक्क, एमवायटी नियामावली, २०१५ च्या तरतुदीनुसार.

- आर्थिक वर्ष २०१८–१९साठी, अ–नियंत्रित खर्च म्हणून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)च्या कराघाताचा दावा केला आहे.

ई. खेळत्या भांडवलावर व्याज (आयओडब्लूसी): प्रमाणकानुसारी व्याजाशी तुलनात्मक वास्तविक व्याज (प्रमाणकानुसारी खेळते भांडवल आणि व्याज दर विचारात घेऊन हिशोब केलेले, एमवायटी नियामावली, २०१५ च्या तरतुदीनुसार) आणि त्यावर व्युत्पन्न निव्वळ हक्क.

ख. आयकर: निर्मिती उद्योगासाठी करपूर्व स्वतंत्र नियमित नफा (पीबीटी) ठरवण्याच्या स्वीकृत पद्धतीच्या आधारे हिशोब केलेला आयकर.

ग. वीज–द्राव्यतिरिक्त उत्पन्न (एनटीआय): तथापि, वास्तविकानुसार याचिकेत तपशीलवार विवरण दिल्याप्रमाणे, काही घटकांचा विचार केला जात नाही.

घ. विजेच्या विक्रीतून महसूल: वास्तविकानुसार

## ३.४ आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये अतिरिक्त प्रभाव

आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये, एईएमएल यांनी कमी खर्चाच्या कर्जांनी थकित कर्जांचे पुनर्वित्तीकरण केले आहे. याचसाठी, पुनर्वित्त शुल्काच्या स्वरूपात एईएमएल यांनी खर्च केला आहे. तसेच, एईएमएल यांनी भांडवली खर्चासाठी ताजी कर्जे घेतली आहेत आणि तसेच, एईएमएल यांनी खेळत्या भांडवलासाठी मंजुरी ही प्राप्त केली असून, त्या प्रक्रियेमध्ये वित्तीय शुल्काची जोखीम पत्करली आहे. अशा प्रकारे, वित्तीय शुल्क आणि पुनर्वित्त शुल्क यांची वेगळी मागणी केली गेली आहे.

त्याशिवाय, एमाअयटी नियामावली, २०१५ च्या तरतुदीनुसार, एईएमएल यांनी पुनर्वित्तकारणाने व्याजाच्या खर्चात होणाऱ्या निव्वळ बचतीशी संबंधित फायद्यांचा हिशोब केला असून निव्वळ बचत २:१ या गुणोत्तरात वाटून घेण्याचा प्रस्ताव ठेवला आहे आणि त्याचा एएआर मध्ये समावेश केला जात आहे.

आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ मधील एकंदर अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी हंगामी अचूक समायोजन खालील तक्त्यामध्ये दाखविले आहे:

### ३.५ आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी अचूक समायोजन

वरील चर्चेवर आधारित, एईएमएल–जी खालील तक्त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१७–१८ साठीच्या अचूक समायोजनाचा सारांश सादर करत आहे:

**तक्ता २: आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी अचूक समायोजन सारांश**

| अनुक्र. | विवरण (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | सुधारित अनुज्ञेय | वास्तविक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | इंधन खर्च | १,०५०.१९ | १,१३४.१० | १,०७०.२५ |
| २ | संचालन व देखभाल खर्च | १५८.२० | १५९.३६ | १५६.५९ |
| ३ | घसारा | ३०.९० | | ३१.५९ |
| ४ | दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १९.८७ | | १८.९८ |
| ५ | खेळत्या भांडवलावर व्याज | १३.३६ | २२.१९ | ०.०० |
| ६ | आयकर | २८.४४ | | २०.१० |

| अनुक्र. | विवरण (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | सुधारित अनुज्ञेय | वास्तविक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| **अ** | **एकूण खर्च** | **१,३००.९७** | | **१,२९७.५१** |
| | | | | |
| ७ | भागभांडवलावरील परतावा | ९२.३४ | | ९२.६४ |
| ८ | अधिक: अधिक उच्च पीएलएफ साठी सूट | - | | - |
| ९ | अधिक: इंधन खर्चामधील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) १/३ | - | | २१.२८ |
| १० | अधिक: ओ एंड एम खर्चामधील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) २/३ | - | | ०.९२ |
| ११ | अधिक: खेळत्या भांडवलाच्या व्याजातील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) १/३ | - | | ७.४० |
| | | | | |
| **ब** | **आरओई + नफा + सूट यांची बेरीज (अ+७+८+९+१०+११)** | **१,३९३.३१** | | **१,४१९.७६** |
| | | | | |
| | **महसूल** | | | |
| १२ | विजेच्या विक्रीमधून महसूल | १,४६८.७६ | | १,४६८.७६ |
| १३ | वीज-द्राव्यतिरिक्त उत्पन्न | १७.२७ | | १७.०६ |
| | | | | |
| **क** | **एकूण महसूल (१२+१३)** | **१,४८६.०३** | | **१,४८५.८२** |
| | | | | |
| **ड** | **महसुली तफावत/(अधिक्य) (ब-क)** | **-९२.७२** | | **-६६.०६** |

एईएमएल-जी माननीय आयोगास विनंती करत आहे की त्यांनी कृपया आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचे वरील महसुली अधिक्य मंजूर करावे.

### ३.६ आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी अचूक समायोजन

वरील चर्चेवर आधारित, एईएमएल-जी खालील तक्त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१८-१९ साठीच्या अचूक समायोजनाचा सारांश सादर करत आहे:

**तक्ता ३: आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी अचूक समायोजनाचा सारांश**

| अनुक्र. | विवरण (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | सुधारीत अनुज्ञेय | अचूक समायोजन वास्तविक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | इंधन खर्च | १,२७०.५२ | १,२७७.०५ | १,१७७.९८ |
| २ | संचालन व देखभाल खर्च | १५९.६८ | १६६.४६ | १७७.२९ |
| ३ | घसारा | ३३.५२ | | ३४.३२ |
| ४ | दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १८.४ | | १८.२९ |
| ५ | खेळत्या भांडवलावर व्याज | ११.९७ | २३.९८ | ८.२३ |
| ६ | आयकर | २८.४४ | | ०.०० |

| अनुक्र. | विवरण (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | सुधारीत अनुज्ञेय | अचूक समायोजन वास्तविक |
|---|---|---|---|---|
| ७ | इतर खर्च | | | ३.५३ |
| ८ | पुनर्वित्त खर्च | | | १२.१० |
| ९ | व्याजावरील खर्चातील बचतीचे निव्वळ वर्तमान मूल्य (एनपीव्ही) | | | १.५० |
| **अ** | **एकूण खर्च** | **१,५२२.५३** | | **१,४३३.२४** |
| | | | | |
| १० | भागभांडवलावरील परतावा | ९४.३३ | | ९४.८५ |
| ११ | अधिक: अधिक उच्च पीएलएफ साठी सूट | – | | – |
| १२ | अधिक: इंधन खर्चामधील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) १/३ | – | | ३३.०२ |
| १३ | अधिक: ओ एंड एम खर्चामधील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) २/३ | – | | –४.३५ |
| १४ | अधिक: खेळत्या भांडवलाच्या व्याजातील कार्यक्षमता नफ्याच्या/(नुकसानाच्या) १/३ | – | | ५.२६ |
| १५ | मागील वर्षाचे अधिक्य | –१५३.९१ | | –१५३.९१ |
| **ब** | **आरओई + नफा + सूट यांची बेरीज (अ+१०+११+१२+१३+१४+१५)** | **१,४६२.९५** | | **१,४०८.१२** |
| | | | | |
| | **महसूल** | | | |
| १६ | विजेच्या विक्रीमधून महसूल | १,४५३.४६ | | १,४५०.०७ |
| १७ | वीज–दराव्यतिरिक्त उत्पन्न | ९.४९ | | १२.२५ |
| | | | | |
| **क** | **एकूण महसूल (१२+१३)** | **१,४६२.९५** | | **१,४६२.३१** |
| | | | | |
| **ड** | **महसुली तफावत / (अधिक्य) (ब–क)** | **०** | | **–५४.२०** |

एईएमएल–जी माननीय आयोगास विनंती करत आहे की त्यांनी कृपया आर्थिक वर्ष २०१८–१९ साठीचे वरील महसुली अधिक्य मंजूर करावे.

### ३.७ आर्थिक वर्ष २०१९-२० साठी हंगामी अचूक समायोजन

वरील चर्चेवर आधारित, एईएमएल-जी खालील तक्त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१९-२० साठीच्या अचूक समायोजनाचा सारांश सादर करत आहे:

**तक्ता ४: आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजन सारांश**

| अनुक्र. | विवरण (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | सुधारित अनुज्ञेय | हंगामी |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | इंधन खर्च | १,२७४.१८ | १,२२६.८३ | १,२२६.८३ |
| २ | संचालन व देखभाल खर्च | १६६.३१ | १८०.५२ | १८०.५२ |
| ३ | घसारा | ३६.०१ | | ३४.५६ |
| ४ | दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १७.४ | | १५.७८ |
| ५ | खेळत्या भांडवलावर व्याज | १२.०८ | २२.५२ | २२.५२ |
| ६ | आयकर | २८.४४ | | ३७.७३ |
| ७ | इतर खर्च | ० | | ०.०० |
| **अ** | **एकूण खर्च** | **१,५३४.४२** | | **१,५१७.९३** |
| | | | | |
| ८ | भागभांडवलावरील परतावा | ९५.८८ | | ९६.६२ |
| ९ | अधिक: अधिक उच्च पीएलएफ साठी सूट | - | | - |
| **ब** | **आरओई + नफा + सूट यांची बेरीज (अ+८+९)** | **१,६३०.३** | | **१,६१४.५५** |
| | | | | |
| | **महसूल** | | | |
| १० | विजेच्या विक्रीमधून महसूल | १,६२०.८१ | | १,५७३.४५ |
| ११ | वीज-दराव्यतिरिक्त उत्पन्न | ९.४९ | | १८.९३ |
| | | | | |
| **क** | **एकूण महसूल** | **१,६३०.३** | | **१,५९२.३८** |
| | | | | |
| **ड** | **महसुली तफावत/(अधिक्य) (ब-क)** | **०** | | **२२.१७** |

एईएमएल-जी माननीय आयोगास विनंती करत आहे की त्यांनी कृपया आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचे उपरोक्त महसुली अधिक्य मंजूर करावे.

**४. आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ च्या महसुली तफावतीवर/(अधिक्यावर) वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट)**

आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ च्या महसुली तफावत/(अधिक्य) वरील वहन खर्चाचा हिशोब एमवायटी नियामावली, २०१५ च्या नियमांप्रमाणे केला गेला आहे. त्यानुसार, एईएमएल–जी यांनी खालील तक्त्यामध्ये पुरवल्याप्रमाणे वहन खर्च आणि संचयी महसुली तफावत/अधिक्य यांचा हिशोब केला आहे.

**तक्ता ५: वहन खर्च आणि संचयी महसुली तफावत/अधिक्य यांचा हिशोब**

| विवरण | रु. कोटी |
|---|---|
| आर्थिक वर्ष १५–१६ आणि आर्थिक वर्ष १६–१७ साठी वाढीव महसुली तफावत | ०.२४ |
| आर्थिक वर्ष १७–१८ साठी वाढीव महसुली तफावत | २६.६६ |
| आर्थिक वर्ष १८–१९ साठी महसुली अधिक्य | (५४.२०) |
| आर्थिक वर्ष १५–१६ आणि आर्थिक वर्ष १६–१७ साठी महसुली तफावतीवर वहन खर्च | ०.१० |
| आर्थिक वर्ष १७–१८ साठी वाढीव महसुली तफावतीवर धारण खर्च | (१.३६) |
| आर्थिक वर्ष १८–१९ साठी महसुली तफावतीवरील धारण खर्च | (१०.७२) |
| आर्थिक वर्ष १९–२० साठी महसुली तफावत | २२.१७ |
| **एकूण** | **(१७.१०)** |

या माननीय आयोगाने त्यांच्या पूर्वीच्या आदेशामध्ये स्वीकारलेल्या तत्वांनुसार, आर्थिक वर्ष २०१९–२० मधील हंगामी अचूक महसुली तफावतीवरील वहन खर्चाचा हिशोब केला गेलेला नाही. आर्थिक वर्ष २०१९–२० साठीच्या महसुली तफावतीची त्या वर्षाच्या अंतिम अचूक समायोजनाच्या याचिकेमध्ये मागणी केली जाईल.

एईएमएल–जी कथित महसुली तफावत/अधिक्य केवळ आर्थिक वर्ष २०२०–२१ मध्येच वसूल करण्याचा आणि ते नियंत्रण काळाच्या शिल्लक वर्षांमध्ये विस्तारत न नेण्याचा प्रस्ताव ठेवत आहे.

**५. नियंत्रण काळासाठी समग्र महसूल आवश्यकतेचा अंदाज**

**५.१ नियंत्रण काळासाठी प्रचालनात्मक कामगिरी**

नियंत्रण काळासाठी निर्मिती आणि त्यावरील इंधन खर्च यांचा अंदाज वर्तवण्यासाठी एईएमएल–जी यांनी, स्थानक उष्णता दर, सहायक वापर, दुय्यम इंधन तेल वापर हे, उपलब्धता आणि पीएलएफ यांच्याशिवाय, एमवायटी नियामावली, २०१९ मध्ये निर्दिष्ट प्रचालनात्मक निकष विचारात घेतले आहेत. प्रत्येक वर्षातील खंडीत वीज प्रवाह कालावधी (आउटेज) विचारात घेता, एडीटीपीएस यांनी उपलब्धतेच्या समान पीएलएफ चा अंदाज वर्तवला आहे.

नियंत्रण काळाच्या प्रत्येक वर्षासाठी एआरआर चा अंदाज करताना, खालील घटक विचारात घेतले आहेत:

- संचालन व देखभालीवरील खर्च – मागील तीन वर्षांसाठीचे वास्तविक खर्च विचारात घेऊन ३.१२% दराने वाढवले आहेत. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) व माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या भविष्य निर्वाह निधीवरच्या आदेश वेगळा विचारात घेतला आहे, कारण मूळ खर्चामध्ये त्यांचा समावेश केला गेलेला नाही. ओ एंड एम या वास्तविक खर्चांचा विचार करण्यामागची तर्कसंगती याचिकेमध्ये पुरवली गेली आहे.

- घसारा – २०१९–२० च्या अखेरच्या अंदाजे शिल्लक आणि नियामावलीत निर्दिष्ट दरांच्या आधारे प्रस्तावित भांडवलीकरणाच्या आधारे हिशोब केलेला.

- कर्जांवरील व्याज – प्रमाणकानुसारी मूळ आधारे मागणी केलेले.

- खेळत्या भांडवलावरील व्याज – नियमावलीतील नियमांवर आधारित आणि नियमावलीमध्ये निर्देशित पद्धतीवर आधारित व्याज दर.

- परताव्याचा दर (आरओई) – दर नियमावलीप्रमाणे (१४% मूळ आरओई मॅट दरासहित ग्रॉस अप केलेले) आणि अतिरिक्त आरओई (१.५% मॅट दरासहित ग्रॉस अप केलेले), एईएमएल–जी दर नियमावलीमध्ये निर्दिष्ट कामगिरी मापदंड प्राप्त करतील हे विचारात घेता.
- वीज–दराव्यतिरिक्त उत्पन्न – आर्थिक वर्ष २०१९–२० साठीच्या प्रस्तावित उत्पन्नाप्रमाणे
- एडीटीपीएस च्या ४थ्या नियंत्रणकाळासाठी एआरआर चा सारांश खालील तक्त्यांमध्ये पुरवला आहे:

## ५.२ नियंत्रण काळासाठी वार्षिक महसुली आवश्यकता

वर चर्चा केलेल्या खर्चांच्या घटकांच्या आधारे, आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळासाठीचे एआरआर खालील तक्त्यांमध्ये सादर केले जात आहे:

**तक्ता ६: नियंत्रण काळासाठीचे एआरआर**

| विवरण (रु. कोटींमध्ये) | आ.व. २१ | आ.व. २२ | आ.व. २३ | आ.व. २४ | आ.व. २५ |
|---|---|---|---|---|---|
| इंधनाशी संबंधित खर्च | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७८.१० | १,३७४.१८ |
| संचालन व देखभालीवरील खर्च | १७७.९३ | १८३.४२ | १८३.४२ | १८९.०८ | १८९.०८ |
| घसारा | ३६.३५ | ३९.५८ | ४१.३४ | ३५.०३ | ३६.११ |
| कर्जावरील व्याज | १७.२२ | २०.१४ | २१.६० | २२.५९ | २४.९० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २२.५८ | २२.७२ | २२.८६ | २३.०१ | २३.०९ |
| **एकूण महसूल खर्च** | **१,६२८.२६** | **१,६४०.०४** | **१,६४३.४०** | **१,६४७.८१** | **१,६४७.३६** |
| अधिक: भागभांडवलावरील परतावे | १२१.२१ | १२६.८७ | १३१.४२ | १३५.३८ | १४०.२९ |
| वजा: वीज-दराव्यतिरिक्त उत्पन्न | -१८.९३ | -१८.९३ | -१८.९३ | -१८.९३ | -१८.९३ |
| समग्र महसूल आवश्यकता | १,७३०.५३ | १,७४७.९८ | १,७५५.८८ | १,७६४.२६ | १,७६८.७२ |
| मागील वर्षांची महसुली तफावत/ (अधिक्य) | -१७.१० | | | | |
| निव्वळ एआरआर | १,७१३.४४ | | | | |

वरील आधारावर, पुढील नियंत्रण काळासाठी प्रस्तावित एएफसी आणि परिवर्तनशील शुल्क खालील तक्त्यामध्ये दाखवले आहे:

**तक्ता ७: नियंत्रण काळासाठी प्रशुल्क**

| विवरण | एकके | आ.व. २१ | आ.व. २२ | आ.व. २३ | आ.व. २४ | आ.व. २५ |
|---|---|---|---|---|---|---|
| वार्षिक स्थिर खर्च | रु. कोटी | ३३९.२६ | ३७३.८० | ३८१.७० | ३८६.१६ | ३९४.५४ |
| परिवर्तनशील खर्च | रु. कोटी | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७८.१० | १,३७४.१८ |
| ऊर्जा शुल्क | रु. /केडब्ल्युएच | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ |

वरील तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेता, एईएमएल-जी माननीय आयोगास प्रार्थना करत आहे की त्यांनी कृपया:

१) यासोबत सादर केलेली याचिका दाखल करून घ्यावी;

२) २०१८ च्या प्रकरण क्र. ३१६ मध्ये जारी केलेल्या पुनरावलोकन आदेशामुळे झालेली अतिरिक्त महसुली तफावत मंजूर करावी;

३) या याचिकेमध्ये हिशोब केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०१७-१८ आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या अचूक समायोजनामुळे उत्पन्न झालेले वास्तविक महसुली तफावत/अधिक्य आणि त्यासह वहन खर्च मंजूर करावे;

४) या याचिकेमध्ये हिशोब केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०१९–२० साठीचे हंगामी अचूक एआरआर आणि महसुली तफावत/अधिक्य मंजूर करावे;

५) या याचिकेमध्ये अंदाज केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०२०–२१ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ नियंत्रण काळाच्या प्रत्येक वर्षासाठी एआरआर आणि प्रशुल्क मंजूर करावे;

६) भविष्यकाळात याचिकेमध्ये भर/फेरफार/सुधारणा/बदल करण्यास परवानगी द्यावी;

७) माननीय आयोगास पारित करण्यास योग्य वाटेल असे इतर कोणतेही शमन, आदेश किंवा निर्देश यांना परवानगी द्यावी;

८) उपरोक्त याचिकेमध्ये अनवधनाने घडलेल्या कोणत्याही चुका/विसंगती/ वगळणे/पूर्णांकनात तफावत यांच्यासाठी क्षमा करावी.

| | |
|---|---|
| मुंबई | अधिकृत प्रतिनिधी |
| डिसेंबर, २०१९ | अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड |